ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक १९७ • सोमवार दि.४ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# प.बंगालसह तीन राज्यात भाजपची सत्ता, तामिळनाडूत विजय थलपतीचा करिश्मा



## केरळमध्ये काँग्रेस सत्तेत;डाव्यांचा पराभव,देशातील २२ राज्यांत भाजप सत्तेत

**नवी दिल्ली: संपुर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या देशातील पाच राज्यांच्या निवडणुकांचे निकाल हाती आले आहेत. पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरीसह तीन राज्यात भाजपने घवघवीत यश मिळविले आहे. तर केरळमध्ये डाव्यांची हॅट्रीक हुकवत काँग्रेसने सत्ता हाती घेतली आहे. तर तामिळनाडूत दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या विजय थलपती यांच्या पक्षाने आपला करिश्मा दाखविला आहे.**


संपुर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या पाच राज्यांच्या बहुचर्चित विधानसभा निवडणुकांचे निकाल सोमवारी जाहीर झाले असून या निकालांनी राष्ट्रीय राजकारणात मोठा भूकंप घडवून आणला आहे. विशेषतः ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचा पश्चिम बंगाल मधील तब्बल १५ वर्षांचा बालेकिल्ला उद्ध्वस्त झाला असून भारतीय जनता पक्ष (भाजप) ने ऐतिहासिक विजय मिळवत सत्ता काबीज केली आहे. या विजयामुळे पूर्व भारतात भाजपचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे स्पष्ट झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजपने २९४ पैकी तब्बल १९४ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले. तृणमूल काँग्रेसला ९३ जागांवर समाधान मानावे लागले, तर काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. डाव्या पक्षांची अवस्था अधिकच बिकट झाली असून त्यांना केवळ ३ जागांवर समाधान मानावे लागले. या निकालामुळे राज्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. ममता बॅनर्जी यांच्या पराभवामुळे राष्ट्रीय स्तरावरही मोठा राजकीय संदेश गेला असल्याचे मानले जात आहे.

दक्षिण भारतातही या निवडणुकांचे परिणाम महत्त्वाचे ठरले. केरळमध्ये काँग्रेसने १०१ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले असून डाव्या आघाडीला ३७ जागांवरच समाधान मानावे लागले. केरळमध्ये अनेक वर्षांपासून सत्ता राखणाऱ्या डाव्या पक्षांचा हा मोठा पराभव मानला जात आहे. त्यामुळे देशात डावेमुक्त भारत झाल्याची चर्चा पुन्हा एकदा जोर धरत आहे.आसाममध्ये भाजपने ९८ जागा जिंकत आपली सत्ता कायम राखली आहे. काँग्रेसला २४ जागांवर समाधान मानावे लागले, तर इतर पक्षांना ४ जागा मिळाल्या. ईशान्य भारतात भाजपचा प्रभाव कायम असल्याचे या निकालांवरून दिसून येते. त्याचप्रमाणे पुद्दुचेरीमध्येही भाजपने २२ जागा जिंकत सत्ता स्थापन केली असून काँग्रेसला ६ जागा मिळाल्या आहेत. तामिळनाडू मध्ये मात्र वेगळीच राजकीय घडामोड पाहायला मिळाली. विजय थलपती यांच्या टीव्हीके

पान ४ वर

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा 'रेकॉर्डब्रेक' विजय

बारामती:बारामती पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी प्रचंड मताधिक्याने ऐतिहासिक विजय संपादन करत विरोधकांना चारीमुंड्या चित केले आहे. तब्बल २ लाख १८ हजार ९३० मतांनी मिळवलेल्या या विजयामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. हा मताधिक्याचा आकडा देशातील पहिल्या क्रमांकाचा विक्रम ठरल्याचा दावा केला जात आहे.



निवडणुकीच्या सुरुवाती पासूनच बारामतीत सुनेत्रा पवार यांच्याच विजयाचे चित्र स्पष्ट दिसत होते. अखेर हा अंदाज खरा ठरवत त्यांनी प्रतिस्पर्ध्यांना मोठ्या फरकाने मागे टाकले. या विजयामुळे बारामतीतील राष्ट्रवादीचा दबदबा पुन्हा अधोरेखित झाला आहे.या पोटनिवडणुकीत सुरुवातीला बिनविरोध निवडणूक होण्याची शक्यता वर्तवली जात होती. शरद पवार यांच्या गटाने उमेदवार न देता सुनेत्रा पवारांना पाठिंबा दिला. तसेच काँग्रेसच्या उमेदवारानेही शेवटच्या क्षणी अर्ज मागे घेतल्याने निवडणुकीचा रंग बदलला. याशिवाय रोहित पवार यांनीही प्रचारात सक्रिय सहभाग घेतला होता.दरम्यान, बारामतीतील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजयाचा विक्रम अजित पवार यांच्या नावावर होता. त्यांनी २०१९ मध्ये १ लाख ६५ हजार २६५ मताधिक्याने विजय मिळवला होता. मात्र सुनेत्रा पवार यांनी हा विक्रम मोडीत काढत नवा इतिहास रचला आहे.अजित पवार यांनी बारामतीतून सलग आठ वेळा विजय मिळवला असून, त्यापैकी अनेक वेळा त्यांनी एक लाखांहून अधिक मताधिक्याने विजय मिळवला आहे. २००९ मध्ये त्यांनी अपक्ष उमेदवार रंजन तावरे यांचा पराभव केला होता, तर २०१९ मध्ये भाजपचे गोपीचंद पडळकर यांना धूळ चारली होती. २०२४ च्या निवडणुकीत त्यांनी युगेंद्र पवार यांच्यावरही मोठा विजय मिळवला होता.या पार्श्वभूमीवर, बारामती पोटनिवडणुकीतील सुनेत्रा पवार यांचा विजय केवळ राजकीय यश नसून भविष्यातील सत्ता-समीकरणांवर परिणाम करणारा निर्णायक टप्पा मानला जात आहे.

# खडकपूरा भागात अतिक्रमण काढत असतांना कर्मचाऱ्यास जमावाची मारहाण

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगर-पालिकेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम सुरु करण्यात आली आहे. आज (सोमवार) दुपारी खडकपूरा भागात रस्त्यावरील अतिक्रमण महापालिकेचे पथक काढत असतांना एका जमावाने त्यास विरोध करुन कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आली.

महानगरपालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक वाहनासह आज दुपारी खडकपूरा भागातील वाघी रोडवरचे अतिक्रमण काढत होते. त्यावेळी परिसरातील जमाव एकत्र जमला. त्यांनी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना अतिक्रमण काढण्यास रोखले. तसेच काही तरुणांनी जेसीबीवर चढून वाहनचालक मालू कांबळे यांना



लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. या घटनेची माहिती महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्यानंतर घटनास्थळी पोलीसांचा फौजफाटा व महापालिकेचे अधिकारी दाखल झाले. पोलीसांनी

पान ४ वर

# भरधाव ट्रकच्या धडकेने ऑटो थेट पानटपरीत

माहुर/प्रतिनिधी-धनोडा-कोठारी या राष्ट्रीय महामार्गावरील लखमापूर फाट्यावर आज दि. ४ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. माहुरकडे भरधाव वेगाने येणाऱ्या के.टी.सी. कंपनीच्या ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ऑटोला जोरदार धडक दिली. धडक इतकी तीव्र होती की, ऑटो थेट बाजूच्या पानटपरीत जाऊन घुसला.

या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, ऑटोचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून



परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. दरम्यान, लखमापूर परिसरात महामार्गावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे वारंवार अपघात होत असल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे. गाव महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी वसलेले असल्याने रस्ता ओलांडताना नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर, येथे तातडीने वेगमर्यादा नियंत्रणासाठी गतीरोधक

पान ४ वर

# नांदेड महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी एमआयएमचे मसुद अहमद खान यांची निवड

## महापौर कविता मुळे यांचा निर्णय;काँग्रेस-वंचित आघाडी न्यायालयात जाणार

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी एमआयएमचे नगरसेवक मसुद अहमद खान यांची निवड करण्यात आली आहे. महापौर सौ.कविता मुळे यांनी मसुद अहमद खान यांना नियुक्ती पत्र आज (सोमवार) सकाळी प्रदान केले. महापौरांच्या निर्णया विरोधात काँग्रेस-वंचित आघाडीने न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे.


नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने ४५ जागा जिंकल्या आहेत. त्यापाठोपाठ एमआयएम १४, काँग्रेस १०, वंचित बहुजन आघाडी ५, शिवसेना शिंदे गट ४, राष्ट्रवादी काँग्रेस २ व एका ठिकाणी अपक्ष नगरसेवक विजयी झाले आहेत. महापालिकेत संख्याबळानुसार दुसऱ्या



क्रमांकाचा पक्ष एमआयएम असल्याने पक्षाचे गटनेते सय्यद मुजीब स.मुख्तार यांनी महापालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी एमआयएमचे नगरसेवक मसुद अहमद खान यांची निवड करावी असे पत्र महापौर व आयुक्तांना दिले होते. काँग्रेस

पान ४ वर

# कॉपी मुक्त परीक्षा ठीक,पण शैक्षणिक दर्जाचे काय करणार?




दृष्टीक्षेप
प्रदीप नागापूरकर

नांदेड-कॉपीमुक्त परीक्षा ही संकल्पना ऐकायला जितकी आकर्षक, तितकीच ती अंमलात आणताना अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरते. अलीकडील बारावीच्या निकालानंतर पुन्हा एकदा हा मुद्दा चर्चेत आला आहे. एकीकडे कॉपीमुक्तीचे धोरण कठोरपणे राबवले जाते, तर दुसरीकडे मुक्त विद्यापीठांच्या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके पाहून उत्तरे लिहिण्याची मोकळीक दिली जाते, हा विरोधाभास दुर्लक्षित करून चालणार नाही.

मुक्त विद्यापीठांची संकल्पना ही वेगळी आहे, हे खरे; ती स्व:अभ्यास, समज आणि अनुप्रयोगावर आधारित आहे. परंतु सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पाहिले, तर ''एकीकडे कडक नियम आणि दुसरीकडे मोकळीक'' असे चित्र निर्माण होते. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील सुसंगततेचा प्रश्न निर्माण होतो. आपण नेमके काय मोजतो आहोत, विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती की समजून घेण्याची क्षमता?

दरम्यान, अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षणाचा दर्जा खालावत चालल्याची भावना समाजात बळावते आहे. वर्ग नियमित होत नाहीत, अध्यापनात सातत्य नाही, अशा तक्रारी वारंवार समोर येतात. परिणामी, पालक आणि विद्यार्थी खाजगी शिकवण्यांकडे वळतात. परंतु येथेही एक गंभीर प्रश्न उभा राहतो; या क्लासेसमध्ये नेमके काय आणि कसे शिकवले जाते, याचा पालक खरोखर आढावा घेतात का? अनेकदा असे दिसते की मोठ्या जाहिराती, ''टॉपर'' विद्यार्थ्यांचे फोटो, आणि निकालांचे आकडे पाहून पालक प्रभावित होतात. हजार विद्यार्थ्यांपैकी काही जण यशस्वी झाले, तरी त्या यशाचा मोठा गाजावाजा करून शिक्षणाच्या गुणवत्तेचा भास निर्माण केला जातो. पण उरलेल्या विद्यार्थ्यांचे काय? त्यांच्यात समज, कौशल्ये आणि विचारक्षमता वाढली का, याचा विचार क्वचितच केला जातो.

शिक्षणाच्या या साखळीत शिक्षक, पालक आणि विद्यार्थी तिघेही कुठेतरी जबाबदारीपासून दूर जाताना दिसतात. शिक्षकांकडून अपेक्षित असलेली बांधिलकी कमी होते, पालक केवळ निकालावर लक्ष केंद्रित करतात, आणि विद्यार्थीही ''गुण मिळवणे'' यालाच अंतिम ध्येय मानतात. या तिघांपेक्षा जास्त धोरणे आखणाऱ्या राजकारण्यांनीही याचा गांभीर्याने विचार करणे अत्यावश्यक आहे. भारतीय समाजसुधारकांनी शिक्षणाला परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे सामर्थ्य अधोरेखित करताना ते ''वाघिणीचे दूध'' असल्याचे म्हटले. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक जागृती घडवून आणली. कर्मवीर भाऊराव पाटील आणि स्वामी रामानंद तीर्थ यांनी दुर्गम भागातही शिक्षण पोहोचवले.

आज त्या परंपरेचा वारसा आपण कितपत जपतो आहोत? कॉपीमुक्त परीक्षा, खाजगी शिकवण्या, इंग्रजी माध्यमाची ओढ; या सर्व गोष्टींच्या पलीकडे जाऊन शिक्षणाचा खरा हेतू काय आहे?, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. शेवटी, प्रश्न कॉपीचा नाही, तर गुणवत्तेचा आहे. प्रश्न परीक्षा पद्धतीचा नाही, तर शिक्षणाच्या आशयाचा आहे. आणि प्रश्न धोरणांचा नाही, तर त्या धोरणांच्या प्रामाणिक अंमल-बजावणीचा आहे. आज गरज आहे ती सर्वांनी अंतर्मुख होण्याची आपण शिक्षण घेतो आहोत का, की फक्त गुणांची शर्यत धावत आहोत?

# नराधमांना कडक शिक्षा;समाजाच्या सुरक्षिततेचा एकमेव मार्ग

**पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नरसापूर येथे घडलेली अल्पवयीन बालिकेवरील अमानुष बलात्कार व खूनाची घटना संपूर्ण समाजाला हादरवून टाकणारी आहे. अशा प्रकारच्या घटनांनी केवळ एका कुटुंबाचा नव्हे, तर संपूर्ण मानवतेचा अपमान होतो. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी स्वयंस्फूर्त आंदोलन करत आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली, ही त्यांच्या संतापाची आणि असहायतेची तीव्र प्रतिक्रिया आहे. प्रश्न असा आहे की, अशा नराधमांना रोखण्यासाठी आणि समाजात सुरक्षितता निर्माण करण्यासाठी नेमके काय करायला हवे? अलीकडच्या काळात अल्पवयीन मुलींवरील अत्याचार आणि लैंगिक शोषणाच्या घटना वाढत चालल्या आहेत. हे केवळ आकडेवारीचे प्रकरण नाही, तर समाजाच्या नैतिक अध:पतनाचे लक्षण आहे. नरसापूर येथील आरोपी हा पूर्वीपासून गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल होते. तरीही तो जामिनावर बाहेर येऊन पुन्हा गुन्हे करत राहिला. यामुळे आपल्या न्यायव्यवस्थेतील त्रुटी स्पष्ट होतात. गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याऐवजी त्यांना सहज जामीन मिळणे, खटल्यांचा विलंब, आणि पुराव्यांच्या अभावामुळे शिक्षा न होणे ही सर्व कारणे अशा गुन्ह्यांना खतपाणी घालतात. समाजात कायद्याचा धाक निर्माण होणे अत्यावश्यक आहे. जेव्हा गुन्हेगारांना खात्री असते की ते शिक्षा टाळू शकतात, तेव्हा त्यांची हिंमत वाढते. त्यामुळे बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी तात्काळ आणि कठोर शिक्षा देणे गरजेचे आहे. फास्ट-ट्रॅक न्यायालयांची प्रभावी अंमलबजावणी, पोलिस यंत्रणेची जबाबदारी निश्चित करणे, आणि दोषींना वेळेत शिक्षा देणे ही काळाची गरज आहे. केवळ कठोर कायदे बनवून उपयोग नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे अधिक महत्त्वाचे आहे. तसेच, अशा गुन्ह्यांच्या मुळाशी असलेली मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे, लहानपणापासूनच मुलांना योग्य संस्कार देणे, आणि लैंगिक शिक्षणाची योग्य मांडणी करणे या गोष्टींकडे समाजाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. केवळ शिक्षा देऊन समस्या संपणार नाही, तर गुन्हे होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागरिकांनी केलेले आंदोलन हे लोकशक्तीचे प्रतीक असले तरी ते केवळ भावनिक प्रतिक्रिया न राहता बदलासाठीचा दबाव निर्माण करणारे असावे. सरकार आणि प्रशासनाने अशा घटनांकडे केवळ कायदेशीर प्रकरण म्हणून न पाहता सामाजिक जबाबदारी म्हणून पाहणे गरजेचे आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करणे ही त्यांची जबाबदारी आहे. शेवटी, नराधमांना कठोर शिक्षा देणे आवश्यक असले तरी समाजानेही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. सुरक्षित, सन्माननीय आणि न्याय्य समाज निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. जर आपण आज कठोर पावले उचलली नाहीत, तर उद्या अशा घटना पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे आता तरी जागे होऊन ठोस कृती करण्याची वेळ आली आहे.**

# राजकारण, विचार आणि नेतृत्व: राज ठाकरे यांच्याकडून अपेक्षा

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नेते आले, गेले, काहींनी आपली ठळक छाप सोडली, तर काही केवळ काळाच्या ओघात विस्मृतीत गेले. पण काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांच्याकडे जनतेची अपेक्षा कायम राहते. राज ठाकरे हे त्यापैकीच एक नाव आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्वगुण, वक्तृत्व, धाडस आणि स्पष्टवक्तेपणा यांचा अनोखा संगम दिसतो. त्यामुळेच अनेकांना वाटते की एक दिवस ते महाराष्ट्राचे अग्रगण्य नेते म्हणून निश्चितपणे पुढे येतील.

मात्र, त्यांच्या राजकीय भूमिकांमध्ये वेळोवेळी होणारे बदल अनेकांना संभ्रमात टाकतात. त्यांच्या भूमिकेतील सातत्याचा अभाव का दिसतो, हा प्रश्न समर्थकांसह विरोधकांनाही पडतो. एकीकडे त्यांचे विचार धारदार आणि प्रभावी असतात, तर दुसरीकडे काही प्रसंगी ते बदललेले दिसतात. राजकारणात लवचिकता आवश्यक असते, पण त्याच वेळी मूल्यांमध्ये सातत्यही महत्त्वाचे असते. याच द्वंद्वामुळे त्यांच्या राजकीय प्रवासाकडे अधिक कुतूहलाने पाहिले जाते. राज ठाकरे यांचा राजकीय प्रवास समजून घ्यायचा असेल, तर शिव सेना मधील त्यांची भूमिका आणि त्यानंतरचा त्यांचा बाहेर पडण्याचा प्रसंग समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ही केवळ एक राजकीय पक्ष नव्हती, तर ती एक भावना होती. त्या भावनेतून अनेक कार्यकर्ते घडले आणि महाराष्ट्रात एक वेगळी राजकीय ओळख निर्माण झाली. राज ठाकरे हे बाळासाहेबांचे अत्यंत जवळचे मानले जात होते. त्यांच्या शैलीत, भाषणात आणि आक्रमकतेत बाळासाहेबांची झलक दिसायची. त्यामुळेच अनेक शिवसैनिक त्यांना बाळासाहेबांचे खरे वारसदार मानत होते. मात्र, पक्षातील अंतर्गत घडामोडींमुळे आणि काही निर्णयांमुळे त्यांना शिवसेना सोडावी लागली. त्या काळातील परिस्थिती पाहता, हा प्रसंग अनेकांसाठी भावनिक होता. अनेकांना असे वाटले की, हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर भावनिक ताणतणावाचा परिणाम होता.



या घटनेने महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण केली. अनेक कार्यकर्ते द्विधा मनःस्थितीत गेले. काहींनी राज ठाकरे यांच्यासोबत नवीन प्रवास सुरू केला, तर काहींनी शिवसेनेतच राहणे पसंत केले. पण त्या घटनेची वेदना आजही अनेकांच्या मनात जिवंत आहे.राज ठाकरे यांच्यातील हिंदुत्वाविषयीची भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट आणि तीव्र राहिली आहे. हिंदू संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रीय अभिमान याबद्दल त्यांची भूमिका ठाम होती. त्यामुळेच अनेकांना त्यांच्यात बाळासाहेबांची छाया दिसत होती. मात्र, काळानुसार त्यांच्या भाषणांमध्ये आणि भूमिकांमध्ये काही प्रमाणात बदल दिसू लागले. काही वेळा त्यांनी सर्वसमावेशकतेवर भर दिला, तर काही वेळा त्यांनी ठाम हिंदुत्ववादी भूमिका घेतली. ही बदलती भूमिका अनेकांना समजून घेणे कठीण जाते. पण राजकारणात परिस्थितीनुसार भूमिका बदलणे ही एक वास्तवता आहे, हेही तितकेच खरे आहे. राज ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, ते योग्य ठिकाणी विरोधकांचेही कौतुक करतात. काही दिवसांपूर्वी त्यांनी शरद पवार यांचे कौतुक केले. हे त्यांच्या व्यापक दृष्टिकोनाचे द्योतक आहे. राजकारणात विरोधकांचा आदर राखणे ही एक सकारात्मक बाब आहे.नेता हा केवळ आपल्या पक्षापुरता मर्यादित नसतो, तर तो समाजाचा असतो. त्यामुळे जो चांगले काम करतो, त्याचे कौतुक करणे आवश्यक आहे. ही भूमिका लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या काळात जातीनिहाय राजकारणाला मोठे महत्त्व मिळाले आहे. प्रत्येक नेत्याला एखाद्या जातीशी जोडून पाहिले जाते. ही प्रवृत्ती समाजासाठी घातक आहे. राज ठाकरे यांनी यावर स्पष्टपणे टीका केली आहे.बाळ गंगाधर टिळक यांना ब्राह्मण म्हणून विरोध करणे चुकीचे आहे, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा केवळ एका समाजापुरता विचार करणेही चुकीचे आहे. या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांचे योगदान संपूर्ण राष्ट्रासाठी आहे.नेता हा जात, धर्म किंवा पंथ यांच्या चौकटीत अडकलेला नसावा. तो संपूर्ण समाजाचा प्रतिनिधी असावा. ही भावना जर समाजात निर्माण झाली, तर अनेक समस्या आपोआप सुटतील.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

इतिहास हा केवळ भूतकाळाचा आढावा नसतो, तर तो भविष्यासाठी मार्गदर्शक असतो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यामुळे आपण आज सुरक्षित आहोत. त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्यामुळे मराठी माणसाला आत्मसन्मान मिळाला.तसेच स्वातंत्र्यलढ्यात अनेकांनी आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या त्यागामुळे आपण आज स्वतंत्र भारतात जगत आहोत. या सर्वांचा विसर पडू नये. इतिहासाची जाणीव ठेवून पुढे जाणे आवश्यक आहे.आज प्रत्येक राजकीय पक्षाचे स्वतःचे माध्यम आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ बातम्या मिळणे कठीण झाले आहे. अनेकदा निर्भीडपणे मांडलेले विचार प्रसिद्ध होत नाहीत. ही परिस्थिती लोकशाहीसाठी धोकादायक आहे. माध्यमांनी निष्पक्ष भूमिका घेतली पाहिजे. सत्य जे आहे ते मांडले पाहिजे.अन्यथा समाजात चुकीची माहिती पसरते आणि लोकांमध्ये संभ्रम निर्माण होतो.आज समाजात श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढत चालली आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे. प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळाली पाहिजे. कोणीही उपाशी राहू नये, कोणीही वंचित राहू नये.नेत्यांनी आपल्या जीवनशैलीकडे पाहिले पाहिजे. ऐशोआरामात जगणाऱ्या लोकांनी सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळाला, तरच खरी प्रगती होईल. आपण आयुष्यभर माझं आणि माझं करत राहतो. पण शेवटी आपण काहीच सोबत घेऊन जात नाही. ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. मोह, माया आणि अहंकार यांपासून दूर राहणे आवश्यक आहे.जीवनात केलेली चांगली कामे, केलेली सेवा आणि दिलेला न्याय हेच खरे आपले ठेवे असतात. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कृतींकडे लक्ष दिले पाहिजे.राज ठाकरे यांच्याकडून महाराष्ट्राला खूप अपेक्षा आहेत. त्यांच्यात नेतृत्वाची क्षमता आहे, हे नाकारता येणार नाही. पण त्यांनी आपल्या भूमिकांमध्ये सातत्य ठेवले पाहिजे. स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली, तर जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल. त्यांनी समाजाला एकत्र आणण्याचे काम केले पाहिजे. जात, धर्म आणि पक्षीय भेद विसरून सर्वांना एकत्र घेऊन जाणे हीच खरी नेतृत्वाची कसोटी आहे.महाराष्ट्राला आज सक्षम, दूरदृष्टी असलेले आणि सर्वसमावेशक नेतृत्वाची गरज आहे. राज ठाकरे यांच्यात ही क्षमता आहे. त्यांनी आपल्या अनुभवातून शिकून पुढे गेले, तर ते निश्चितच महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतील.

समाजानेही नेत्यांकडून केवळ अपेक्षा ठेवून चालणार नाही, तर स्वतःही जबाबदारीने वागले पाहिजे. सत्य स्वीकारणे आणि असत्याला नाकारण्याची वृत्ती निर्माण झाली, तर समाज अधिक सक्षम होईल.शेवटी, एकच विचार महत्त्वाचा आहे, आपण सर्व एक आहोत. सर्वांचे प्रश्न हे आपल्या प्रश्न आहेत ही भावना निर्माण झाली, तर समाजात खऱ्या अर्थाने सुख, शांती आणि समृद्धी नांदेल.

# माजी खा.डॉ.व्यंकटेश काब्दे यांना पद्मश्री द्यावा

## ‘नांएसो’च्या कृतज्ञता सोहळ्यात मान्यवरांचा सूर



नांदेड/प्रतिनिधी-सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ, विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे अष्टपलू व्यक्तिमत्व हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या लढ्यातील थोर स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटीचे तब्बल २४ वर्ष अध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळलेले माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक कार्याची दखल घेऊन सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार द्यावा असा सूर शुक्रवारी नांदेड एज्युकेशन सोसायटी द्वारा पुरणमल लाहोटी सभागृहात झालेल्या कृतज्ञता सोहळ्यात मान्यवरांनी व्यक्त केला.

नांदेड एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या निवृत्ती निमित्त कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे नूतन अध्यक्ष सीए डॉ.प्रवीण पाटील होते. सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड.प्रफुल अग्रवाल, सचिव प्रा. श्यामल पत्की सहसचिव ॲड.प्रदीप नागापूरकर, कार्यकारिणी सदस्य ॲड.चिरंजीलाल दागडिया, सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, पीपल्स कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगांवकर, पीपल्स हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, कुंजम्मा काब्दे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. काब्दे यांच्या सप्तनीक सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना डॉ. काब्दे म्हणाले की आमच्या कुटुंबासाठी हा आनंदाचा क्षण असून आपण सर्वांनी मला वर्षानुवर्ष आधार देत प्रेम केले. स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या संस्थेत गोविंद भाई श्रॉफ यांच्यासोबत मला काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. संस्थेत काम करत असताना चांगल्या विचाराने प्रेरित होऊन काम करणारी माणसं इथे मिळाली. माझ्यासारखा सर्वसामान्य माणूस संस्थेत आला आणि आपण बळ दिलं इथं काम केल्याने माझा आयुष्य वाढलं ते तुम्ही वाढवलं. आपल्या मनातील ज्योत नेहमी प्रज्वलित राहते हा संस्थेत काम करण्याचा फायदा झाला. यामुळे जीवनात नेहमी प्रकाश राहतो असे डॉ. काब्दे म्हणाले.

सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, ॲड. चिरंजीलाल दागडिया, नौनिहालसिंग जहागिरदार, डॉ. ए.टी. शिंदे, प्रा. डॉ यशपाल भिंगे, उपप्राचार्य एकनाथ खिल्लारे, राहुल गोरे, डॉ. शिवशंकर भानेगांवकर, प्रशांत चौधरी, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, डॉ.कल्पना जाधव, यावेळी संस्थेचे नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे संचालक सेवानिवृत्त प्राचार्य डी.यु.गवई, डॉ. आर.एन. जाधव आदींनी याप्रसंगी डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या व जुन्या आठवणींना उजाळा दिला. सहसचिव ॲड.प्रदीप नागापूरकर यांनी डॉ. व्यंकटेश काब्दे यांचा आपल्या वडिलांमुळे सहवास आल्याचे सांगून डॉ. काब्दे व सदाशिव पाटील यांच्यामुळे संस्थेत सहभागी झाल्याचे सांगितले व डॉ. काब्दे हे चौफेर, अष्टपैलू व्यक्तिमत्व असून सर्वच क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविला असे ते म्हणाले.

कार्यकारिणी सदस्य प्रा.डॉ.यशपाल भिंगे यांनी. डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या व्यक्तिमत्व व कार्यावर प्रकाश टाकला व त्यांच्या सामाजिक, निस्वार्थ भावनेने केलेल्या कामाची दखल घेऊन सध्याच्या सरकारने डॉ. काब्दे यांना पद्मश्री पुरस्कार देण्याची मागणी केली व पुढील पिढीला डॉ. काब्दे यांच्या कार्याची ओळख व्हावी व त्यातून प्रेरणा मिळावी म्हणून डॉ. काब्दे यांनी आपले आत्मकथन लिहावे अशी विनंती केली.

नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ. काब्दे हे निवृत झाले नाहीत ते सतत मार्गदर्शन करत राहणार आहेत. यांनी आपले आयुष्य ज्या तत्त्वाने जगले त्याच तत्त्वावर आपल्याला चालायचे आहे. आमचे रक्त जरी वेगळे असले तरी डीएनए सारखाच आहे असे सीए डॉ. प्रवीण पाटील म्हणाले. कार्यक्रमाची सांगता डॉ. काब्दे साहेबांच्या सन्मानार्थ सर्वांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात केली.

यावेळी भाजपचे नेते तथा नवनियुक्त एफसीआयचे सदस्य ॲड.चैतन्य बापू देशमुख, कार्यकारिणी सदस्य तथा भाजप नगरसेविका शांभवी साले, धनंजय डोईफोडे, माजी मुख्याध्यापक प्रभाकर कानडखेडकर, सीए तोतला, रवी भारतीय, प्रा.बालाजी कोम्पलवार यांच्यासह संस्थेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सेवानिवृत्त प्राध्यापक प्राचार्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शामल पत्की यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विजय कदम यांनी तर आभार प्रदर्शन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रफुल अग्रवाल यांनी केले.

# पिपल्स हायस्कूलच्या सौ.भालेराव यांना सेवानिवृत्तीबद्दल निरोप

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स हायस्कूल येथे शाळेच्या पर्यवेक्षिका सौ.राजश्री भालेराव यांच्या सेवानिवृत्तीबद्दल निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्रा.सौ शामलताई पत्की, प्रमुख अतिथी म्हणून शालेय समिती अध्यक्ष स. नौनिहालसिंघ जहागीरदार, शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, सौ. बोराळकर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सोनाली केंद्रे यांची विशेष उपस्थिती होती. वरील मान्यवरांच्या हस्ते सौ.भालेराव यांचा यथोचित सत्कार करून भेटवस्तू देण्यात आले. याप्रसंगी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव पदी पाचव्यांदा निवड झाल्याबद्दल प्रा. सौ. शामलताई पत्की त्यांचा शालेय समिती व शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना शामलताई पत्की यांनी सौ भालेराव यांच्या कार्याचा गौरव करून यापुढेही शाळेचे नावलौकिक वाढविण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी एकजुटीने काम करण्याचे आव्हान केले. यावेळी नौनिहाल सिंघ जागीरदार यांनी शाळेतील शिक्षकांनी शाळेच्या विकासासाठी करीत असलेल्या उपक्रमाबद्दल माहिती देऊन लवकरच शाळेची भव्य इमारत उभी करण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, सूत्रसंचालन सौ श्रद्धा सावले व आभार व्ही. आर. चिलवरवार यांनी मानले. याप्रसंगी सौ भालेराव यांचे नातेवाईक व शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# सत्यगणपती देवस्थानात उद्या जमणार मेळा

## अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त विशेष नियोजन

अर्धापूर/प्रतिनिधी-अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त दाभड (ता.अर्धापूर) येथील श्री सत्यगणपती देवस्थानात मंगळवारी (दि.५) मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. देवस्थानचे प्रशासक तथा तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी भाविकांना शिस्तबद्ध दर्शनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



अर्धापूर-नांदेड मार्गावरील हे देवस्थान 'जागृत' म्हणून ओळखले जाते. अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. दर्शनासाठी कोणत्याही प्रकारचे पास देण्यात येणार नसून, सर्वांसाठी मोफत दर्शनाची व्यवस्था आहे. दर्शन रांगा सोमवारी (दि.४) मध्यरात्रीपासून सुरु होणार असून, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा असणार आहेत. दर्शनानंतर भाविकांनी मंदिराच्या उजव्या बाजूने बाहेर पडावे, तसेच चप्पल-बूट काढूनच रांगेत उभे राहावे, असे निर्देश दिले आहेत. दर्शन रांगांसाठी बॅरिकेड्स उभारण्यात येणार असून, परिसरात विक्रेत्यांना दुकाने लावण्यास मनाई केली आहे. यासाठी कलम १४४ लागू करण्यात आले आहे. वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था केली असून, ग्रामस्थांसह प्रशासनाकडून तयारी सुरु आहे.

# हदगावमध्ये भूरा परिवाराकडून गेल्या ८ वर्षांपासून अविरत जलसेवा

हदगाव/प्रतिनिधी-आजच्या धावपळीच्या युगात आणि 'बिसलरी' संस्कृतीच्या जमान्यात विनामूल्य समाजसेवा करणे दुर्मिळ झाले आहे. मात्र, हदगाव येथील भूरा परिवाराने माणुसकीचे दर्शन घडवत गेल्या आठ वर्षांपासून तहानलेल्यांसाठी पाण्याचे छत्र उभे केले आहे. प्रखर उन्हाळ्यात वाटसरूंची तहान भागवण्यासाठी या परिवाराने राबवलेला हा उपक्रम शहरात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे.

केवळ उन्हाळ्यातच नव्हे, तर वर्षभर सेवा शहरातील प्रसिद्ध भारत मेडिकल च्या माध्यमातून भूरा परिवारातर्फे ही जलसेवा दिली जाते. विशेष म्हणजे, ही सेवा केवळ उन्हाळ्यापुरती मर्यादित नसून, वर्षभर अविरतपणे सुरू असते. हनुमान मंदिर परिसर आणि परिसरातील मुख्य चौकातून येणाऱ्या-जाणाऱ्या हजारो नागरिकांना या शुद्ध आणि थंड पाण्याचा लाभ मिळत आहे. मराठवाड्यात उन्हाचा पारा चाळीशी पार गेला आहे. अशा भीषण उष्णतेत थंड पाणी अमृतसमान ठरते. दररोज सरासरी ६० ते ७० पाण्याचे मोठे कॅन संपत आहेत. शहरात येणारे ग्रामीण भागातील नागरिक आणि मजुरांसाठी हे हक्काचे ठिकाण बनले आहे. भूरा परिवाराने आपल्या इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्येही अशाच प्रकारे पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे.



भूरा परिवाराचा हा उपक्रम समाजातील इतर व्यापारी, उद्योजक आणि सक्षम नागरिकांसाठी एक आदर्श आहे. जर प्रत्येकाने आपल्या घरासमोर किंवा दुकानासमोर अशी 'पाणपोई' सुरू केली, तर उन्हाळ्यात कोणाचीही तहान भागवण्यासाठी वणवण होणार नाही. या उपक्रमामुळे 'तहानलेल्याला पाणी' देण्याची आपली भारतीय परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, सर्वच स्तरांतून भूरा परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;९ जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील अरुणोदयनगर भागात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर भाग्यनगर पोलीसांनी शनिवारी रात्री धाड टाकुन ९ जणांना अटक केली. त्यांच्याकडून साडेचार लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

अरुणोदयनगर भागातील लक्ष्मण पानशॉप जवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती भाग्यनगर पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक संतोष तांबे व पोलीस कर्मचाऱ्यांनी शनिवारी रात्री जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून अंदर-बाहर नावाचा जुगार खेळतांना गौतम दौलत जोंधळे रा.सिद्धार्थनगर, आजिजखान इस्माइलखान रा.पौर्णिमानगर, राहुल गणपत मोरे रा.कल्याणनगर, सागर उत्तमराव सूर्यवंशी रा.संतोषनगर, लक्ष्मण तुकाराम चिंचोके, स्वप्नील प्रकाश गजभारे रा.अरुणोदयनगर, अतुल कवडे रा.राहुल कॉलनी, विठ्ठल धोतरे रा.अरुणोदयनगर व नंदकिशोर कदम रा.पौर्णिमानगर यांना अटक केली आहे.

# सहस्त्रकुंड धबधब्यावर पोलीस चौकीला हिरवा कंदील



किनवट/प्रतिनिधी-पर्यटनस्थळ संबोधल्या गेलेल्या सहस्त्रकुंड येथील लक्षवेधी ठरलेल्या धबधब्याच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस प्रमुखांनी आढावा घेतला असून, पोलीस चौकी कार्यान्वीत करण्यासाठी २ मे रोजी प्रत्यक्ष पहाणी केली. विदर्भ-मराठवाडा सिमेवरील पैनगंगेचा धबधबा लोकार्षणाचा केंद्रबिंदू ठरल्याने लोकांची वर्दळ लक्षात घेऊन मागणीवरून पोलीस चौकीवर शिक्कामोर्तब झाल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांचा २ मे रोजी सहस्त्रकुंडचा दौरा झाला. मराठवाडा आणि विदर्भाची सिमा निश्चित करणाऱ्या पैनगंगेवरील धबधबा हा पर्यटकांचे आकर्षण ठरल्याने दिवसेंदिवस लोकवर्दळीत वृद्धीझालीय. परंतु पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न मात्र नेहमीच ऐरणीवरच होता. पोलीस चौकीची मागणी नेहमीच केली जात होती. नेमकी पावसाळ्यात पर्यटकांची गर्दी होत असते. यापुर्वी काही पर्यटकांना केवळ सुरक्षेअभावी परिणाम भोगावे लागले. म्हणून उशिरा का होईना परंतु सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीस चौकीविषयक जिल्हा पोलीस अधीक्षकांचा दौरा होऊन जवळपास पोलीस चौकीचा प्रश्न मार्गी लागलाय हे विशेष. जागा आणि रुम उपलब्धतेनुसार एका रुममध्ये तात्पुरत्या स्वरूपात पोलीस चौकी सुरू करण्याचा मार्ग मोकळा झालाय. एका रूम मध्ये सुरू करण्यात येत आहे. दरम्यान सहस्त्रकुंड ट्रस्टचे सचिव सतिश वाळकीकरांनी पर्यटन स्थळासह विविध प्राप्त माहिती अवगत करून दिली. यावेळी इस्लापुरचे सपोनी उमेश भोसले, पत्रकार ईश्वर जाधव, गौतम कांबळे, पोलीस पाटील रवी खोकले, नारायण शिंनगारे, बळीराम चव्हाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती असल्याचे सुत्रांनी सांगितले.

# माहूरमध्ये बालविवाह रोखण्यास प्रशासनाला यश

माहूर/प्रतिनिधी्-चाइल्ड हेल्पलाइनवर प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे महिला व बाल विकास विभागाने तात्काळ कारवाई करत माहूर तालुक्यातील दत्तमांजरी येथे होणारा बालविवाह रोखण्यात यश मिळवले.

मिळालेल्या माहितीनुसार, दत्तमांजरी येथील अल्पवयीन मुलगी आणि तांदळा येथील वर मुलाचा विवाह दि. ३ मे रोजी सकाळी ११.४५ वाजता होणार होता. या अनुषंगाने माहूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, ग्रामस्थ व संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत तातडीने शहानिशा करण्यात आली. तपासा दरम्यान संबंधित मुलीचे वय केवळ १६ वर्षे ६ महिने १७ दिवस असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे हा विवाह बालविवाह कायद्यानुसार गुन्हा ठरत असल्याने तो तत्काळ थांबवण्यात आला. या कारवाईत ग्रामविकास अधिकारी बी.बी. कासदेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, पोलीस पाटील रितेश केंद्रे, अंगणवाडी सेविका वनिता गजलवार, पोलीस कर्मचारी गजानन चौधरी, सरपंच सुनीता अर्जुन पवार, दत्तमांजरी येथील तंटामुक्ती अध्यक्ष नरसिंह चव्हाण, तांदळा येथील तंटामुक्ती अध्यक्ष प्रभात वानखेडे, तसेच ग्रामपंचायत सेवक विलास राठोड यांचा सहभाग होता. संबंधित कुटुंबीयांना समुपदेशन करून कायद्याची जाणीव करून देण्यात आली. तसेच भविष्यात असा प्रकार घडणार नाही, यासाठी त्यांच्याकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले. बालविवाहा सारख्या गंभीर गुन्ह्यांबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाइन १०९८ या टोल-फ्री क्रमांकावर कळवावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# फेरनोंद प्रकरणात प्रशासनाची टाळाटाळ;सेवानिवृत पोलीस कर्मचाऱ्यावर अन्याय

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मौजे कावळगुडा येथील सर्वे क्रमांक १९ मधील सुमारे ६ एकर जमिनीच्या फेरनोंद प्रकरणाने गंभीर वादाचे रूप घेतले असून, संबंधित नागरिकाने वारंवार अर्ज, तक्रारी आणि पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

सदर प्रकरणात कावळगड्डा येथील अर्जदार राजेंद्र इरन्ना पांचाळ यांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत धाव घेतली आहे. मात्र, १९५५-५६ पासूनच्या नोंदी, १९६९ मधील फेरनोंद, आणि त्यानंतरच्या बदलांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येत असूनही प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. उपलब्ध दस्ताऐवजांनुसार, मूळ अभिलेखातील क्षेत्रफळ आणि नंतरच्या फेरनोंदीत मोठा फरक दिसून येतो. विशेष म्हणजे, काही नोंदी कायद्याच्या तरतुदींना धरून नसल्याचा स्पष्ट दिसून येतो. तहसील कार्यालयाने चौकशीचे आदेश दिले असले तरी, प्रत्यक्षात कोणतीही अंतिम कार्यवाही झालेली नाही. उलट, संबंधित प्रकरणात वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्यात आले आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, वारंवार अर्ज करूनही प्रशासन केवळ पत्रव्यवहार करत आहे, पण न्याय देण्याची ठोस भूमिका घेत नाही.यामुळे प्रशासनावर दुर्लक्ष, टाळाटाळ आणि जबाबदारीपासून पळ काढण्याचे आरोप पांचाळ यांच्याकडून होत आहेत. यासाठी सेवा निवृत्त पोलीस कर्मचारी राजेंद्र इरना पांचाळ हे न्याय मागण्यासाठी १ मे महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर ४० डिग्री तापमानात उन्हाच्या लाटा सोसत येथील उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर समोर धरणे आंदोलन करीत न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाने देखील संबंधित अधिकाऱ्यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात न्याय मिळण्यासाठी अजूनही नागरिकाला प्रतीक्षा करावी लागत आहे.संतप्त राजेंद्र पांचाळ यांनी इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर योग्य निर्णय घेऊन जमीन नोंदी दुरुस्त केल्या नाहीत, तर मोठ्या आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल. नाईलाजास्तव आत्मदहनचा मार्ग सुद्धा स्वीकारणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.राजेंद्र पांचाळ यांच्या मागणीचे मुख्य मुद्दे असे आहेत की, सर्वे नं.१९ मधील जमीन नोंदीत गंभीर तफावत, १९५५ ते २०२६ पर्यंतच्या नोंदींमध्ये विसंगती. राजेंद्र पांचाळ न्यायासाठी प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारत आहे. प्रकरणात हेदराबाद कुळ कायदा १९५० अंतर्गत कारवाई अपेक्षित असताना, अधिकाऱ्यांनी केवळ कागदी घोडे नाचवल्याचे चित्र आहे. यामुळे राजेंद्र पांचाळ यांच्यावर जाणीवपूर्वक अन्याय होत असल्याचे दिसून येत आहे.

# दिवसाच्या वीज वापरात ७० लाख ग्राहकांना २२३५ कोटी रुपयांचा लाभ

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायं.५ या कालावधीतील वीज वापरासाठीटीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायं.५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे. सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायं.५ या कालावधीतील वीजवापरासाठीप्रतीयुनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. स्मार्टमीटरमध्ये कोणत्या वेळी किती वीजवापर झाला हे मोजण्याची सुविधा असल्याने स्मार्टमीटर बसविलेल्या घरगुती ग्राहकांना या सुविधेचा लाभ होत आहे. औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे.

# ऑपरेटरच्या मृत्यू प्रकरणी हायवा चालकावर गुन्हा

माहूर/प्रतिनिधी-जुनापाणी परिसरातील कन्स्ट्रक्शन साईटवर झालेल्या भीषण आणि धक्कादायक अपघाताने कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. माती टाकताना झालेल्या गंभीर निष्काळजीपणामुळे एका तरुण ऑपरेटरला जीव गमवावा लागला असून, या प्रकरणी हायवा चालकाविरुद्ध अखेर माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत अजितकुमार यादव (वय ३१, रा. झारखंड) हे जेसीबी ऑपरेटर म्हणून काम करत होते. दि. २ मेच्या मध्यरात्री सुमारास कन्स्ट्रक्शन साईटवर माती टाकण्याचे काम सुरू असताना, हायवा चालक अजय रामदास मलगाम (वय २८, रा. गोकुळ गोंडेगाव, ता. माहूर) याने बेफिकीरपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविले. त्याने मागून दिलेल्या जोरदार धडकेत अजितकुमार यादव खाली पडले आणि त्यानंतर हायवातून टाकण्यात आलेल्या मातीखाली दबून त्यांचा जागीच मृत्यू झाला अशा आशयची तक्रार या घटनेनंतर मृताचे भाऊ राजदेव यादव यांनी माहूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करत आरोपी चालकाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली. त्यांच्या फिर्यादीवरून हायवा क्रमांक एमएच-२६-सीएच-९३०० चा चालक अजय मलगाम याच्याविरुद्ध निष्काळजीपणाने मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा रविवारी (ता. ३) दुपारी दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे कन्स्ट्रक्शन साईटवरील सुरक्षेचे नियम केवळ कागदावरच असल्याचे स्पष्ट झाले असून, प्रशासनाने संबंधित कंपनीवरही कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा अशा घटना पुन्हा घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, कामाच्या ठिकाणी कोणतीही ठोस सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप होत असून, अशा बेदरकार पद्धतीने काम सुरू असल्याने कामगारांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके करीत आहेत.

# कल्लाळ नदी घाटावर पोलीसांची धाड; ५१ लाखांचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील मौजे कल्लाळ नदी घाटावर पोलीसांनी रविवारी दुपारी धाड टाकुन ५१ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

मौजे कल्लाळ शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेतीचा उपसा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पो.नि.ओमकांत चिंचोलकर, फौजदार ज्ञानेश्वर मटवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी दुपारी नदी घाटावर छापा टाकला. पोलीसांना बघून रेती उपसा करणारे मजूर तराफे व साहित्य सोडून पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरुन पाण्यात तरंगणारे ५४ तराफे, सहा इंजीन, रेतीचा साठा, प्लास्टीकचे साहित्य व इतर साहित्य असा ५१ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. पोलीसांनी पंचासमक्ष जप्त केलेले तराफे घटनास्थळीच जावून नष्ट केले. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार जोपासले तर आदर्श गावाची निर्मिती होईल-मेंगशेट्टी

भोकर/प्रतिनिधी-राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीते मधून आदर्श गाव कसा असावा ही संकल्पना मांडली त्याचबरोबर गावाची एकता, संघटन, जातीभेद निर्मूलन, व्यसनमुक्ती, देशभक्ती अशा विषयाची जीवनभर जनजागृती केली त्यांचे विचार जोपासले तर आदर्श गावाची निर्मिती होईल असे विचार भोकरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांनी भोकर येथील ग्राम जयंती उत्सवात बोलताना मांडले.

भोकर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मारक समिती आश्रमात ३० एप्रिल रोजी ग्राम जयंती उत्सव साजरा करण्यात आला त्यानिमित्त सामुदायिक प्रार्थना किर्तन राष्ट्रीय भजन असे कार्यक्रम झाले. १ मे रोजी झालेल्या सांगता समारोहात उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आज गावागावात रुजणे गरजेचे आहे असे विचार मांडले, तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी गावाची स्वच्छता सुंदरता एकता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारामुळे टिकून राहील असे मत व्यक्त केले. उमरी येथील प्रतिष्ठित व्यापारी विजय आप्पा उत्तरवार यांनी या कार्यासाठी पुढाकार घेत असून गावागावांमध्ये तुकडोजी महाराजांचे विचार पोहोचले पाहिजे असे मत मांडले. नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांनी ग्रामगीता हा ग्रंथ वाचून कृतीमध्ये आणायचा असल्याचे मत व्यक्त केले, प्रास्ताविकात समितीचे सहसचिव बी.आर.पांचाळ यांनी भोकर हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रचाराचे मराठवाडा स्तरीय केंद्र बनावे असे विचार मांडले. या कार्यक्रमास स्मारक समितीचे अध्यक्ष बापूराव पा. सोनारीकर, उपाध्यक्ष बालाजी पाटील, भाऊसाहेब बराटे, नगरपरिषद उपाध्यक्ष दिलीपराव सोनवडे, नगरसेवक डॉ. बालाजी बिलरवार, विठ्ठल पा.धोंडगे, गणेश यशवंतकर, गौतम कसबे, डॉ.मनोज गीमेकर, अविनाश वाघमारे, दिनेश लक्षटवार, सिद्धार्थ पिटलेवाड यांच्यासह गुरुदेव सेवा मंडळाचे गोपाळ महाराज मुळझरेकर, शेषेराव पा.लगळुदकर, गंगाप्रसाद जामदरीकर, गोविंद माऊली पार्डीकर यांच्यासह सर्व गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# गळफास घेवून शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना वासरी ता.मुदखेड येथे घडली आहे. शेतकरी योगेश हरी कल्याणे रा.वासरी यांनी शेतीसाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. नापिकीमुळे कर्जाची परतफेड करता आली नाही. शनिवारी सकाळी राहत्या घरी गळफास घेवून योगेश कल्याणे यांनी आत्महत्या केली.

# दिल्लीत काव्यगौरव,किनवटमध्ये शेतकरी त्रस्त;वारसा फेरफार प्रकरणे धुळखात

## कवितेत संवेदनशीलता,प्रत्यक्षात शेतकऱ्यांना न्याय कधी?

किनवट/प्रतिनिधी-दिल्लीच्या महाराष्ट्र सदनातील बहिणाबाई चौधरी सभागृहात जागर कर्तृत्वाचा-उत्सव साहित्याचा या सदराखाली संपन्न झालेल्या महिला साहित्य संमेलनात किनवटच्या तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकरांनी साहित्यकृतीच्या काव्यपंक्तीतून सामाजिक संवेदनशीलतेचे भान व्यक्त करीत काव्यप्रतिभेचा ठस्सा उमटवला खरा. सामाजिक जाणीवेतून गरीब ते मध्यमवर्गीय शेतकऱ्यांच्या वारसा फेरफारांसह विविध स्वरूपाच्या वर्षभरापासून जाणीवपूर्वक धूळखात ठेवलेल्या प्रकरणांना संवेदनशीलतेची किनार लाऊन प्रतिभावंतता दाखवून देण्याची वेळ आली आहे.

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनाच्या आयुक्त सचिव आणि सरहद संस्थेच्या वतीने माहे एप्रिलमध्ये दोन दिवस्यीय अखिल भारतीय महिला शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन पार पडते. त्या नाविन्यपूर्ण संमेलनात किनवटच्या तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकर निमंत्रित प्रतिनिधी होत्या. त्यांनी काव्यमय सादर केलेल्या अभिव्यक्तीला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला. साहित्य आणि प्रशासन याची अनोखी सांगड घालून सामाजिक संवेदनशीलतेच्या मांडलेल्या काव्यपंक्तींनी उपस्थितांच्या मनांवर प्रतिभाशालीचा ठस्सा उमटवला असला तरी, सामाजिक जाणीवेतून शेतकऱ्यांच्या कामांना देखील संवेदनशीलतेतून न्याय देऊन त्यांचीही मने जिंकायला हवीत अशी शेतकरी वर्तुळातून चर्चा ऐकायला मिळते.

### वारसा फेरफारही लाचखोरीच्या विळख्यात

वारसा फेरफारची प्रकरणे वर्ष वर्ष मागे पडली तरी सुद्धा प्रतिभावंत तहसीलदार डॉ.चोंडेकरांच्या काळात जाणीवपूर्वक धूळखात ठेवली आहेत. लाच दिल्याशिवाय कामच होत नाही याची ज्वलंत साक्ष देणाऱ्या निसपूर सज्जाच्या लाचखोर महिला ग्राम महसूल अधिकारी भाग्यश्री तेलंग आणि कन्नकवाडीच्या महिला ग्राम महसूल अधिकारी सुजाता गवळे यांना आठरा हजार रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहाथ पकडल्याच्या घटनेला आकरा महिने होताहेत. तरीसुद्धा प्रतिभावंतांनी त्यानंतरही सामाजिक जाणीवेतून शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता दाखवलेली दिसत नाही. राजगड येथील पतीच्या शेतीतील काही शेतजमीन वारसा हक्कानुसार पत्नीच्या नावे फेरफार करून देण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी स्तरावरुन सर्व सोपस्कार पूर्ण करून वर्षभराचा काळ लोटतोय तरी प्रकरणाची साधी सुनावणी देखील घेतलेली नाही. महाराष्ट्र शासनाचे अनेक उपक्रम आली पण त्यातूनही प्रकरण निकाली काढले नाही. हेच एक प्रकरण नाही तर असे अनेक प्रकरणे आहेत. राज्याच्या महसूल मंत्र्यांनी, पालकमंत्र्यांनी अशा अधिकाऱ्यांना आणि आमदारांनी आढावा बैठकीत जाब विचारायला हवा. परंतु त्यांनीही भ्रष्टाचाराचे गालबोट लागलेल्या प्रशासनावर अंकुश लावलेला नाही, म्हणून वर्ष वर्ष गरीब आणि मध्यमवर्गीय शेतकऱ्यांची कामे केली जात नाहीत असा वैतागलेल्या लोकांचा आरोप आहे.

# पंढरपूर कॉरिडॉरसाठी ४ हजार कोटींचा विकास आराखडा मंजुर

सोलापूर:राज्यातील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांपैकी एक असलेल्या पंढरपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्पाला अखेर राज्य सरकारची मंजुरी मिळाली आहे. मुंबईत पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या शिखर समिती बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सुमारे ४,००० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी आराखड्याला हिरवा कँदील देण्यात आला.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री जयकुमार गोरे, गणेश नाईक तसेच आमदार समाधान आवताडे यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. बैठकीत १ ऑगस्टपर्यंत भूसंपादन आणि इतर प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. विशेषतः आषाढी व कार्तिकी एकादशीला प्रचंड गर्दी होत असल्याने मंदिर परिसरात सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे दिसून येते. गेल्या आषाढी एकादशीला तब्बल २८ लाख भाविकांनी उपस्थिती लावल्याची नोंद एआय तंत्रज्ञानाद्वारे झाली होती. याच पार्श्वभूमीवर मंदिर परिसराचा विस्तार, सुरक्षितता आणि गर्दी व्यवस्थापन लक्षात घेऊन हा कॉरिडॉर प्रकल्प आखण्यात आला आहे.




पुण्यातील नरसापूर येथे चिमुकल्या मुलीवर बलात्कार करुन तीची हत्या करणाऱ्या आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी अ.भा.ब्राह्मण महासंघाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेवून निवेदनाद्वारे केली. यावेळी प्रदेशाध्यक्ष निखील लातूरकर, माजी आ.अमरनाथ राजूरकर, ॲड.महेश कनकदंडे, शितल खांडील, प्रविण साले व इतर उपस्थित होते.

# वचनपूर्तीची ग्वाही:कुंडलवाडीत 'नमो उद्यान'सह १.४५ कोटींच्या कामांचे भूमिपूजन

कुंडलवाडी/प्रतिनिधी-नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करत नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांनी सोमवारी (दि.४ मे २०२६) शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन केले. यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नगरपरिषदेच्या कामकाजाबाबत सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत.

कुंडलवाडी शहरात गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांकडून मनोरंजनासाठी सुसज्ज उद्यान उभारण्याची मागणी होत होती. याची दखल घेत नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांनी निवडणुकीदरम्यान शहरात भव्य गार्डन उभारण्याचे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने नमो उद्यान योजनेअंतर्गत तब्बल ८१ लाख रुपयांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.यासोबतच शहरातील मुख्य बाजारपेठेतील नाली व रस्त्यांच्या बांधकामासाठी ६४ लाख रुपयांच्या विकासकामांचीही सुरुवात करण्यात आली. या दोन्ही महत्त्वाच्या कामांमुळे शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.तसेच, हेडगेवार चौक येथे कै. के. रामलू यांच्या स्मरणार्थ पानपोईचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार व उपाध्यक्षा सौ. नेहाताई शैलेश याकावार यांच्या हस्ते विधिवत प्रारंभ करण्यात आला.यावेळी गजानन कोटलावार, नगरसेवक प्रकाश पाटील अर्जुने, राजेश्वर उत्तरवार, गटनेते रमेश ईरलावार, गंगाधर कोटलावार, शेख मुक्त्यावर, डॉ. प्रशांत सब्बनवार, संजय भास्करे, मारुती कोटलावार, प्रदीप खेळगे, साईनाथ भातनाते, संजय गोनेलवार, नगरसेविका नेहा गड्डुवार, सोनू सबनवार, सौ. अर्चना पोतनकर, प्रतिनिधी संजय खूळगे, अमरनाथ कांबळे, नरसिंमलू कोटलावार, शेख नशीर, गंगाधर रुद्रूरकर, भीम पोतनकर, अजय गड्डुवार यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.नगराध्यक्षा कोटलावार यांनी यावेळी सांगितले की, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून दिलेली प्रत्येक हमी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# संस्था ताब्यात घेण्यासाठी बनावट कागदपत्रांआधारे फसवणूक; गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी- मुखेड तालुक्यातील शिकारा येथील विकास गंगा प्रतिष्ठान या संस्थेचे संस्थापक सिद्धार्थ जाधव यांच्या अपघाती निधन झाले होते. त्यांच्या विधवा पत्नीला विश्वासात घेऊन परस्पर बनावट कागदपत्रे निर्माण करून सदर संस्था ताब्यात घेण्यासाठी फसवणूक केल्याप्रकरणी माधवी सिद्धार्थ जाधव त्यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दोघां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुखेड तालुक्यातील येथे विकास गंगा प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना सिद्धार्थ जाधव यांनी २००० मध्ये केली होती. त्यांच्या पत्नी अध्यक्ष तर ते स्वतः सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी संस्थेअंतर्गत पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादक पदविका हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. याच संस्थेअंतर्गत शिकारा येथे नवबौद्ध व अनुसूचित जाती जमाती विद्यार्थ्यांसाठी निवासी आश्रम शाळेचा २००४ साली सादर केलेला प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी विचाराधीन आहे. संस्थाचालक सिद्धार्थ जाधव यांचे दि. ९ जून २०२४ रोजी मुखेड येथे अपघाती निधन झाले. सदर संस्था ताब्यात घेण्याच्या उद्देशाने त्यांची विधवा पत्नी माधवी यांचे नातेवाईक संतोष गायकवाड, शंकर गच्चे व गौतम सावंत यांनी मीनाक्षी शेषराव लोकडे व संतोष शंकर गायकवाड यांच्यासह गीताबाई नामदेव सावंत यांची संस्थेमध्ये नवीन नियुक्ती केली व माधवी सिद्धार्थ जाधव यांचा विश्वासघात केला आहे. या लोकांनी माधवी जाधव यांच्या नावे पाचशे रुपयांचे बॉण्ड परस्पर खरेदी करून संस्था व संस्थेअंतर्गत चालणारे उपक्रम सुमारे ५० लाख रुपयांत विक्री केल्याचे नमूद करून फसवणूक केल्याप्रकरणी माधवी सिद्धार्थ जाधव यांच्या फिर्यादीवरून संतोष शंकर गायकवाड व मिनाक्षी शेषेराव लोकडे यांच्या विरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं -१२२/ २०२६ अन्वये विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# साहेबराव मोरे यांना सेवा,श्रद्धा आणि समर्पण पुरस्कार प्रदान



भोकर/प्रतिनिधी- हिमायतनगर येथे राष्ट्रनिर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात भोकर नगर परिषदेचे साहेबराव हरी मोरे यांना सेवा, श्रद्धा आणि समर्पण हा पुरस्कार दि.२९ एप्रिल रोजी राज्य मराठी पत्रकार परिषदचे केंद्रीय अध्यक्ष मधुसुदन कुलथे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार त्यांच्या समाजाभिमुख कार्याची दखल घेणारा असून, केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नाही समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या सर्वच कार्यकर्त्यांच्या योगदानाची पावती मानला जात आहे. साहेबराव मोरे यांना मिळालेला हा पुरस्कार त्यांच्या कार्याला मिळालेली योग्य दाद असून, त्यामुळे इतरांनाही समाजहितासाठी पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळणार आहे.

# जावरला येथील विहिरीत पडलेल्या बिबट्याची सुखरुप सुटका



मांडवी/प्रतिनिधी-जागतिक बिबट दिन (३ मे) निमित्तानेच मांडवी वनविभागाने धाडसी आणि संवेदनशील कामगिरी करत जावरला येथील एका शेतकऱ्यांच्या विहिरीत पडलेल्या बिबट्याला सुखरूप बाहेर काढून जीवदान दिले. या घटनेमुळे वनविभागाच्या तत्परतेचे आणि नियोजनबद्ध कार्यपद्धतीचे कौतुक होत आहे.

वनपरिक्षेत्र मांडवी अंतर्गत मौजे जावरला येथे श्री. मोहन मस्कोले यांच्या शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याची माहिती मिळताच वनविभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. उपवनसंरक्षक नांदेड श्रीमती मनीषा पाटील, सहाय्यक वनसंरक्षक किनवट किरण चव्हाण तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी शिरसेटवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही बचाव मोहीम राबविण्यात आली. अत्यंत संयम, दक्षता आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत वनपाल निलेश तायडे, वनरक्षक सुनील गायकवाड, शिवदास गुजर, ज्योती इजळे, उषा सोनटक्के, निलेश गवले, शेषराव कायपाक, सिद्धन कहाते आदी कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग होता. अखेरच्या टप्प्यात बिबट्याला कोणतीही इजा न होता सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात यश आले. या घटनेमुळे मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी वनविभागाची भूमिका किती महत्त्वाची आहे, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

पान १ वरुन

### प.बंगालसह तीन राज्यात...

पक्षाने १०९ जागा जिंकत पारंपरिक द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन्ही पक्षांना मोठा धक्का दिला आहे. द्रमुकला ६० तर अण्णाद्रमुकला ६५ जागांवर समाधान मानावे लागले. तामिळनाडूमधील हा निकाल राज्याच्या राजकारणात नवा अध्याय सुरू करणारा ठरला आहे. या सर्व निकालांनंतर देशातील २२ राज्यांमध्ये भाजप किंवा भाजप-आघाडीचे सरकार सत्तेत आले आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, बिहार, आसाम, पश्चिम बंगाल यांसारख्या महत्त्वाच्या राज्यांचा यात समावेश असून भाजपची राजकीय पकड अधिक मजबूत झाल्याचे दिसून येते. दुसरीकडे पंजाबमध्ये आम आदमी पार्टी, झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा,तर कर्नाटक,तेलंगणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसची सत्ता कायम आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील स्थानिक राजकारणातही भाजपने जोरदार कामगिरी केली आहे. राहुरी पोटनिवडणुकीत भाजपचे अक्षय कर्डिले यांनी १,१५,८५५ मते मिळवत ९०,९७९ मतांची आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी एसपीचे गोविंद मोकाटे यांना २४,८७६ मते मिळाली असून इतर उमेदवार मागे पडले आहेत. बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी एकतर्फी वर्चस्व राखत १,८९,६५७ मते मिळवली असून विरोधकांना मोठा धक्का दिला आहे.

### खडकपूरा भागात...

चार ते पाच जणांना ताब्यात घेतले आहे. आणखी काही जणांचा शोध पोलीस घेत आहेत. महापालिकेचे उपायुक्त अजितपालसिंघ संधू, सहाय्यक आयुक्त गौतम कवडे, अतिक्रमण विरोधी पथकाचे प्रमुख विशाल सोनकांबळे, दत्ता कल्याणकर यांनी वजिराबाद पोलीस स्टेशनमध्ये जावून तक्रार दिली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

### भरधाव ट्रकच्या धडकेने...

बसविणे, सूचना फलक उभारणे तसेच वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी जोर धरत आहे. डॉ. दिलीप राठोड यांच्यासह स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तात्काळ लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे.

### नांदेड महानगरपालिकेच्या विरोधी...

व वंचित बहुजन आघाडी निवडणूक पूर्व युती झालेली असून या आघाडीकडे १५ नगरसेवक आहेत. सदरील संख्याबळानुसार विरोधी पक्षनेतेपदावर काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने दावा करुन विरोधी पक्षनेतेपदासाठी माजी उपमहापौर अब्दुल गफार यांची शिफारस दोन्ही पक्षाकडून करण्यात आली. महापौर कविता मळे यांनी विधी व नगरसचिव विभागाचा अभिप्राय घेवून व अधिकाराचा वापर करुन एमआयएमचे नगरसेवक मसुद अहमद खान यांची विरोधी पक्षनेतेपदी सोमवारी निवड केली आहे. उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृह नेते ॲड.महेश कनकदंडे, स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, नगरसेवक किशोर स्वामी यांच्या उपस्थितीत मसुद अहमद खान यांना महापौरांनी नियुक्तीचे पत्र प्रदान केले. यावेळी एमआयएमचे माजी प्रदेशाध्यक्ष सय्यद मोईन, फेरोज लाला यांच्यासह एमआयएमचे नगरसेवक उपस्थित होते.

# कोट्यवधींच्या उलाढाल प्रकरणी प्रतिभा चाकणकरांची ईडीकडून चौकशी

नाशिक:भोंदू बाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात याच्याशी संबंधित कथित मनी लाँडरिंग प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) तपासाची गती वाढवली आहे. या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर आज ईडी कार्यालयात चौकशीसाठी हजर झाल्या. त्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार मानल्या जाणाऱ्या अशोक खरात याने तब्बल १३४ हून अधिक प्रॉक्सी (बनावट) खाती चालविल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या खात्यांमार्फत कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तपासादरम्यान प्रतिभा चाकणकर यांच्या नावावर या पतसंस्थेत चार खाती असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या काही वर्षांत या खात्यांमधून सुमारे २.२० कोटी ते २.४० कोटी रुपयांपर्यंतचे संशयास्पद व्यवहार झाल्याची नोंद ईडीने घेतली आहे. हे व्यवहार खरातशी संबंधित असल्याचेही प्राथमिक तपासातून उघड झाले आहे. दरम्यान, प्रतिभा चाकणकर यांनी यापूर्वी अशोक खरातशी कोणताही संबंध नसल्याचा दावा केला होता. मात्र सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी समोर आणलेल्या माहितीनुसार, १ एप्रिल २०२५ ते १७ मार्च या कालावधीत चाकणकर आणि खरात यांच्यात तब्बल २३६ वेळा संपर्क झाल्याचे समोर आले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४